सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

(सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१)

# महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियम, १९८१

(दिनांक २० जून २००६ पर्यंत सुधारलेला)

**(MAHARASHTRA ACT No. LXI OF 1981)**

# The Maharashtra Advocates Welfare Fund Act, 1981

*(As modified up to 20th June 2006)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद ४३१ ००१ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने संचालनालये, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत रु. ५-००]

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१

# महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियम, १९८१

## अनुक्रमणिका

**उद्देशिका :**

कलमे

### प्रकरण - एक

### प्रारंभिक


| | | पृष्ठे |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | १ |
| २. | व्याख्या | १ |


### प्रकरण - दोन

### अधिवक्ता कल्याण निधीची रचना


| | | |
|---|---|---|
| ३. | अधिवक्ता कल्याण निधीची रचना | २ |


### प्रकरण - तीन

### विश्वस्त समितीची स्थापना आणि त्या समितीकडे कल्याण निधी निहित असणे


| | | |
|---|---|---|
| ४. | विश्वस्त समितीची स्थापना | ३ |
| ५. | विश्वस्त समितीच्या नामनिर्देशित सदस्यांची निरर्हता व त्यांना काढून टाकणे | ३ |
| ६. | विश्वस्त समितीच्या नामनिर्देशित सदस्यांनी राजीनामा देणे आणि नैमित्तिक रिक्त पदे भरणे. | ४ |
| ७. | पद रिक्त असताना सदस्यांनी कृती करणे, विश्वस्त समिती, इत्यादी यांच्या कृती अनौपचारिकतामुळे विधिअग्राह्य न ठरणे. | ४ |
| ८. | विश्वस्त समितीच्या बैठकी | ४ |
| ९. | विश्वस्त समितीच्या सदस्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देणे | ६ |
| १०. | निधी निहित करणे आणि त्याचा वापर | ६ |
| ११. | विश्वस्त समितीची कामे | ७ |
| १२. | निधी, कर्जे घेणे, गुंतवणूक करणे | ७ |
| १३. | सचिवाचे अधिकार आणि कर्तव्ये | ७ |


### प्रकरण - चार

### वकील संघाला मान्यता व त्याची नोंदणी


| | | |
|---|---|---|
| १४. | वकील संघाला मान्यता व त्याची नोंदणी | ७ |
| १५. | वकील संघाची कर्तव्ये | ८ |


### प्रकरण - पाच

### निधीचे सदस्यत्व आणि त्यातून रकमेचे प्रदान


| | | |
|---|---|---|
| १६. | निधीचे सदस्यत्व | ८ |
| १७. | व्यवसाय बंद झाल्यावर निधीतून रक्कम देणे | ९ |


### प्रकरण - सहा

### वकीली परिषदेने मुद्रांक छापवून घेणे व त्यांचे वितरण करणे


| | | |
|---|---|---|
| १८. | मुद्रांकांची छपाई व त्यांचे वितरण आणि वकील परिषदेने विक्रीचे उत्पन्न विश्वस्त समितीकडे देणे. | १० |

## प्रकरण - सात
## संकीर्ण


| | | |
|---|---|---|
| १९. | वकीलपत्रावर मुद्रांक असणे .. .. .. .. | ११ |
| २०. | वकीलपत्रावर लावलेला कल्याण निधी मुद्रांक रद्द करणे .. .. | १० |
| २१. | विवक्षित प्रकरणात कलमे १९ व २० पासून सुट .. .. .. | ११ |
| २२. | समितीच्या कोणत्याही निर्णयाविरुध्द अपील .. .. .. | ११ |
| २३. | सदस्यांसाठी गट आयुर्विमा आणि अधिवक्त्यासाठी इतर लाभ .. .. | ११ |
| २४. | निधीच्या सदस्यांच्या हितसंबंधाचे अन्यसंक्राभण, जप्ती इत्यादींवर निर्बंध .. | ११ |
| २५. | सद्‌भावनेने केलेल्या कृतीचे संरक्षण .. .. ... .. | १२ |
| २६. | दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध .. .. .. | १२ |
| २७. | साक्षीदारांना बोलाविण्याचे आणि पुरावा घेण्याचे अधिकार .. .. | १२ |
| २८. | विनियम करण्याचे अधिकार .. .. .. .. | १२ |
| | अनुसूची .. .. .. .. .. | १३ |

सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१[1]

# महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियम, १९८१

[ ५ नोव्हेंबर १९८१ रोजी राज्यपाल यांची अनुमती मिळाल्यानंतर, **महाराष्ट्र शासन राजपत्रात** दिनांक ६ नोव्हेंबर १९८१ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला ].

**महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी स्थापन करणे व त्याचा विनियोग महाराष्ट्रातील अधिवक्त्यांना विवक्षित निवृत्तिलाभ आणि इतर लाभ देण्यासाठी करणे यांसाठी अधिनियम**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यात अधिवक्ता कल्याण निधी स्थापन करणे व त्याचा विनियोग महाराष्ट्र राज्यातील अधिवक्त्यांना विवक्षित निवृत्तिलाभ आणि इतर लाभ देण्यासाठी करणे व त्यांच्या बाबतीतील इतर संबंधित किंवा आनुषंगिक बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे, त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बत्तिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी अधिनियम. १९८१ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) तो राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल त्या [2]तारखेस अंमलात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर —

(अ) "अधिवक्ता" म्हणजे, महाराष्ट्राच्या वकील परिषदेने अधिवक्ता अधिनियमाच्या कलम १७ अन्वये तयार केलेल्या व ठेवलेल्या यादीत नाव नोंदलेली आणि वकील संघाची सदस्य असणारी व्यक्ती;

१९६१ चा २५. (ब) "अधिवक्ता अधिनियम" म्हणजे, अधिवक्ता अधिनियम, १९६१;

(क) "अधिवक्ता' कल्याण निधी" किंवा "निधी" म्हणजे, या अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेला व ठेवला जाणारा निधी;

(ड) "वकील संघ" बार (असोसिएशन) म्हणजे, महाराष्ट्र राज्यात कोणत्याही विवादात पुरावा घेण्यास, त्याचा अभिनिर्णय करण्यास किंवा निर्णय करण्यास कायद्याने प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही न्यायालयाशी किंवा कोणत्याही न्यायाधिकरणाशी किंवा अन्य प्राधिकरणाशी किंवा व्यक्तीशी संलग्न असलेला आणि वकील परिषदेने कलम १४ खाली मान्यता दिलेला, अधिवक्त्यांचा संघ;

(ई) "वकील परिषद" म्हणजे, अधिवक्ता अधिनियमाच्या कलम ३ अन्वये, स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र वकील परिषद;

(फ) "व्यवसाय बंद होणे" म्हणजे, वकील परिषदेने ठेवलेल्या राज्य यादीतून एखाद्या अधिवक्त्यांचे नाव, तो निवृत झाल्यामुळे किंवा मरण पावल्यामुळे काढणे;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक १७-८-१९८१, भाग पाच, पृ. ४१८-४१९ (इंग्रजी) पहा.

[2] २० नोव्हेंबर १९८१ शासकीय अधिसूचना, विधी व न्याय विभाग क्र. सीएफए-१०७८/२३३-(८१)-एक्स, दिनांक १९ नोव्हेंबर १९८१ पहा.

(ग) "अवलंबून असलेल्या व्यकती" म्हणजे, पत्नी, पती, वडील, आई आणि अविवाहित अज्ञान मुले किंवा यांच्यापैकी जे हयात असतील ते;

(ह) "निधीचा सदस्य" म्हणजे, निधीचे लाभ मिळण्यासाठी मान्य करण्यात आलेला आणि या अधिनियमाच्या तरतुदीन्वये निधीचा सदस्य म्हणून चालू राहणारा अधिवक्ता ;

(आय) "विहित" म्हणजे, या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांद्वारे वकील परिषदेने विहित केलेले ;

(ज) "निवृत्ती" म्हणजे, वकील परिषदेला तसे कळवून आणि वकील परिषदेने तशा अर्थाची नोंद घेतल्यानंतर अधिवक्ता म्हणून करावयाचा व्यवसाय थांबवणे ;

(के) "मुद्रांक" किंवा "कल्याण निधी मुद्रांक" म्हणजे, वकील परिषदेने कलम १८ खाली छापून वितरित केलेला मुद्रांक किंवा कल्याण निधी मुद्रांक ;

(ल) "राज्य" म्हणजे, महाराष्ट्र राज्य ;

(म) "व्यवसाय स्थगित करणे" म्हणजे, अधिवक्ता म्हणून, स्वखुषीने व्यवसाय स्थगित करणे किंवा वकील परिषदेने अधिवक्ता अधिनियमाखाली गैरवर्तणुकीबद्दल केलेले निलंबन ;

(न) "विश्वस्त समिती" किंवा "समिती" म्हणजे, कलम ४ खाली स्थापन केलेली विश्वस्त समिती किंवा समिती ;

(ओ) "वकीलपत्र" या संज्ञेत, ज्याद्वारे अधिवक्त्याला, कोणत्याही विवादात पुरावा घेण्यास, त्याचा अभिनिर्णय करण्यास किंवा निर्णय करण्यास कायद्याने प्राधिकृत केले असेल अशा, कलम १४ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे कोणत्याही न्यायालयासमोर किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर अथवा व्यक्तीसमोर कामकाज करण्याचा, हजर राहण्याचा किंवा वाद प्रतिवाद करण्याचा अधिकार मिळाला असेल अशा हजर राहण्यासंबंधीच्या ज्ञापनाचा किंवा कोणत्याही नावे संबोधण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही दस्तऐवजाचा समावेश होईल.

## प्रकरण दोन

## अधिवक्ता कल्याण निधीची रचना

अधिवक्ता कल्याण निधीची रचना.

**३.** (१) राज्य शासनाने, अधिवक्ता कल्याण निधी या नावाने संबोधल्या जाणाऱ्या एका निधीची रचना केली पाहिजे.

(२) या निधीत पुढील रकमा जमा केल्या पाहिजेत :-

(अ) रु. १०,००० ची प्रारंभिक रक्कम किंवा ३१ डिसेंबर १९८१ पूर्वी या निधींमध्ये वकील परिषद जी इतर अधिक रक्कम जमा करील ती रक्कम; आणि पोट-कलम (३) खाली १९८२ या वर्षापासून पुढे दर वर्षी वकील परिषदेकडून देण्यात येणाऱ्या सर्व रकमा;

(ब) वकील परिषदेने दिलेले इतर कोणतेही अंशदान;

(क) भारताच्या वकील परिषदेने किंवा कोणत्याही वकील संघाने किंवा कोणत्याही अधिवक्त्यांनी निधीला स्वेच्छेने दिलेली कोणतीही देणगी किंवा अंशदान;

(ड) कलम १८ खाली मुद्रांकांची विक्री करुन जमवलेल्या सर्व रकमा;

(ई) या बाबतीत करावयाच्या रीतसर विनियोजनाद्वारे राज्य शासन निधीला देईल अशी कोणतीही अंशदाने;

(फ) इतर संस्था किंवा व्यक्ती यांच्याकडून वेळोवेळी मिळणारी व निधीत जमा केली जाणारी कोणतीही अनुदाने, देणग्या, दाने आणि लाभदाने;

(ग) कलम १२ खाली कर्जाऊ घेतलेली कोणतीही रक्कम;

(ह) कोणत्याही गट विमापत्राखाली निधीच्या कोणत्याही सदस्याच्या मृत्यूनंतर भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून मिळालेल्या सर्व रकमा;

(आय) भारतीय आयुर्विमा महामंडळाकडून, निधीच्या सदस्यांच्या गट विमापत्राबाबत मिळालेला कोणताही नफा किंवा लाभांश;

(जे) कलम १६ खाली अर्जाची फी व वार्षिक वर्गण्या म्हणून वसूल केलेल्या सर्व रकमा व त्यावरील व्याज;

(के) निधीच्या कोणत्याही भागाची कोणतीही गुंतवणूक करुन मिळालेले कोणतेही व्याज किंवा लाभांश किंवा अन्य उत्पन्न.

(३) वकील परिषदेने वसूल केलेल्या नाव नोंदणी फीच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक नसणाऱ्या दराने, राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी अधिसूचित करीत अशी रक्कम दरवर्षी निधीला दिली पाहिजे.

## प्रकरण तीन

### विश्वस्त समितीची स्थापना आणि त्या समितीकडे कल्याण निधी निहित असणे

विश्वस्त समितीची स्थापना.

४. (१) राज्य शासनाने शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून, महाराष्ट्र अधिवक्ता कल्याण निधी विश्वस्त समिती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एका समितीची स्थापना केली पाहिजे;

(२) विश्वस्त समिती ही एक निगम निकाय असेल, तिला अखंड परंपरा असेल व तिची एक सामान्या मुद्रा असेल आणि तिला, उक्त नावाने मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा किंवा तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि तिला उक्त नावाने दावा लावता येईल व त्या नावाने तिच्यावर दावा करता येईल.

(३) विश्वस्त समिती पुढील सदस्यांची मिळून होईल :–

(अ) महाराष्ट्राचे महा अधिवक्ता हे, विश्वस्त समितीचे पदसिध्द सभापती असतील;

(ब) सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन पदसिध्द ;

(क) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले, तीन सदस्य;

(ड) वकील परिषदेने नामनिर्देशित केलेले, वकील परिषदेचे दोन सदस्य;

(ई) वकील परिषदेचा कोषाध्यक्ष हा, विश्वस्त समितीचा पदसिध्द कोषाध्यक्ष असेल; आणि

(फ) वकील परिषदेचा सचिव हा, विश्वस्त समितीचा पदसिध्द सचिव असेल.

(४) पोट-कलम (३), खंड (क) अन्वये राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या सदस्याने, राज्य शासनाने त्याचे नामनिर्देशन तत्पूर्वी समाप्त केले नाही किंवा त्याला कलम ५, पोट-कलम (२) खाली काढून टाकले नाही किंवा त्याने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा सादर केल्यानंतर राज्य शासनाने कलम ६, पोट-कलम (१) खाली त्याचा राजीनामा स्वीकारला नाही तर, चार वर्षाच्या मुदतीसाठी पद धारण केले पाहिजे.

(५) पोट-कलम (३), खंड (ड) खाली वकील परिषदेने नामनिर्देशित केलेल्या सदस्याने, कलम ५, पोट-कलम (२) खाली त्याला काढून टाकण्यात आले नाही किंवा त्याने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यानंतर कलम ६, पोट-कलम (१) खाली वकील परिषदेने त्याचा राजीनामा स्वीकारला नाही तर, चार वर्षांची मुदत किंवा वकील परिषदेतील त्याच्या सदस्यत्वाची मुदत यांपैकी कमी असणाऱ्या मुदतीसाठी पद धारण केले पाहिजे.

विश्वस्त समितीच्या नामनिर्देशित सदस्यांची निरर्हता व त्यांना काढून टाकणे.

५. (१) कलम ४, पोट-कलम (३) च्या खंड (क) किंवा खंड (ड) खाली नामनिर्देशित केलेला सदस्य, पुढील परिस्थितीत विश्वस्त समितीचा सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल :-

(अ) तो मनाने विकल झाला; किंवा

(ब) तो नादार झाल्याचे न्यायनिर्णीत झाला; किंवा

(क) विश्वस्त समितीच्या परवानगीवाचून समितीच्या लागोपाठच्या तीन बैठकीत तो अनुपस्थित राहिला; किंवा

(ड) (तो निधीचा सदस्य असल्यास) तो निधीचा बाकीदार असेल किंवा त्याने विश्वासघात केला ; किंवा

(ई) नैतिक अधः तनाचा समावेश असणाऱ्या अपराधाबद्दल त्याला फौजदारी न्यायालयाकडून सिध्दापराध ठरविण्यात आले असेल आणि ही अपराधसिध्दी रद्द ठरवण्यात आलेली नसेल ;

(२) राज्य शासनास, पोट-कलम (१) खाली निरर्ह ठरलेल्या कोणत्याही सदस्याचे विश्वस्त समितीचे सदस्यत्व काढून घेता येईल :

परंतु, त्या सदस्याला व त्याचे नामनिर्देशन वकील परिषदेने केले असल्यास वकील परिषदेला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याशिवाय, कोणत्याही सदस्याला काढून टाकणारा कोणताही आदेश देता कामा नये.

आणखी असे की, ज्याबाबतीत राज्य शासनाने, या पोट-कलमान्वये कोणत्याही प्रकारे निरर्ह किंवा काढून टाकण्यास पात्र ठरविणाऱ्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणावरुन कलम ४, पोट-कलम (४) अन्वये त्याने नामनिर्देशित केलेल्या एखाद्या सदस्याचे सदस्यत्व समाप्त केले तर त्या बाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

विश्वस्त समितीच्या नामनिर्देशित सदस्यांनी राजीनामा देणे आणि नैमित्तिक रिक्त पदे भरणे.

६. (१) कलम ४, पोट-कलम (३) च्या खंड (क) किंवा (ड) अन्वये नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही सदस्यास, यथास्थिति, राज्य शासनाला किंवा वकील परिषदेला एक महिन्याची लेखी नोटीस देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल, आणि राज्य शासनाकडून किंवा वकील परिषदेकडून असा राजीनामा स्वीकारण्यात आल्यानंतर, त्याने त्याचे पद रिक्त केले आहे असे समजण्यात येईल :

परंतु, वकील परिषदेने राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या सदस्याचा राजीनामा स्वीकारण्यापूर्वी राज्य शासनाशी विचारविनिमय केला पाहिजे.

(२) सदस्याच्या मृत्यूमुळे, त्याने राजीनामा दिल्यामुळे, त्याची सेवा समाप्त करण्यात आल्यामुळे किंवा त्याला पदावरुन काढून टाकल्यामुळे कलम ४, पोट-कलम (३) च्या खंड (क) किंवा (ड) अन्वये नामनिर्देशित केलेल्या सदस्याचे रिकामे होणारे नैमित्तिक पद, सोयीप्रमाणे शक्य होईल तितक्या लवकर यथास्थिती, राज्य शासनाकडून किंवा वकील परिषदेकडून, त्यावर एखादी व्यक्ती नामनिर्देशित करुन भरता येईल ; आणि अशा प्रकारे नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीने, ज्या सदस्याच्या जागेवर तिची नामनिर्देशनाद्वारे नेमणूक झालेली असेल त्या सदस्याचे पद रिकामे झाले नसते तर ज्या मुदतीपर्यंत त्याने ते धारण केले असते त्या मुदतीपर्यंत, ते पद धारण केले पाहिजे.

पद रिक्त असताना सदस्यांनी कृती करणे, विश्वस्त समिती इत्यादी यांच्या कृती अनौपचारिकतामुळे विधिअग्राह्य न ठरणे.

७. (१) विश्वस्त समितीमधील कोणतेही पद रिक्त असताना, पदावर असलेल्या सदस्याना, जणू काही पद रिक्त झालेले नाही असे समजून, काम करता येईल.

(२) सदस्याचे कोणतेही पद रिक्त असले किंवा विश्वस्त समितीच्या रचनेत कोणताही दोष असला किंवा तिचा सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या नामनिर्देशनात कोणताही दोष किंवा नियमबाह्यता असली किंवा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करण्यात आलेल्या विनियमान्वये केलेल्या प्रकरणाच्या गुणदोषास बाधा न आणणाऱ्या कोणत्याही कृतीमध्ये किंवा कामकाजामध्ये कोणताही दोष किंवा नियमबाह्यता असली तरीही, विश्वस्त समितीला कृती करण्याचा अधिकार असेल ; आणि तसे करण्याचा हक्क नसलेल्या एखाद्या व्यक्तीने बैठकीत भाग घेतल्याचे किंवा मतदान केल्याचे किंवा अन्यथा कामकाजामध्ये भाग घेतल्याचे किंवा वर नमूद केल्याप्रमाणे एखादा दोष किंवा नियमबाह्यता असल्याचे नंतर आढळून आले असले तरीही, समितीचे असे कामकाज विधिग्राह्य असेल.

विश्वस्त समितीच्या बैठकी.

८. (१) या अधिनियमाखाली किंवा त्याखाली तयार केलेल्या विनियमाखाली कामकाज करण्यासाठी तीन कॅलेंडर महिन्यातून निदान एकदा किंवा आवश्यक वाटल्यास त्यापेक्षा अधिक वेळा विश्वस्त समितीची बैठक भरली पाहिजे.

(२) विश्वस्त समितीच्या तीन सदस्यांनी समितीच्या बैठकीची गणपूर्ती होईल.

(३) सभापती किंवा, त्याच्या अनुपस्थित, एखादा निवडून देण्यात आलेला सदस्य, विश्वस्त समितीच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी असेल.

(४) विश्वस्त समितीच्या बैठकीपुढे मांडण्यात आलेल्या कोणत्याही बाबीवर, बैठकीत उपस्थित असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने निर्णय घेतला पाहिजे आणि समसमान मते पडल्यास त्याबाबतीत, सभापतीला किंवा बैठकीच्या अध्यक्षस्थानी असलेल्या सदस्याला निर्णायक मत असेल.

विश्वस्त समितीच्या सदस्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देणे.

**९.** विश्वस्त समितीचे अशासकीय सदस्य व वकील परिषदेचे सदस्य हे, अनुज्ञेय असेल असा प्रवास भत्ता व दैनिक भत्ता मिळण्यास पात्र असतील :

परंतु, समितीचा सदस्य हा, महाराष्ट्र विधानसभेचा किंवा महाराष्ट्र विधानपरिषदेचा सदस्य किंवा संसद सदस्य असेल तर, अशा सदस्याला देय होणारे भत्ते हे, राज्य विधानमंडळाच्या किंवा संसदेच्या किंवा त्यांच्या समित्यांच्या बैठकीस उपस्थित राहताना होणारा वैयक्तिक खर्च भागविण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला यथास्थिती, राज्य विधानमंडळाचा किंवा संसदेचा सदस्य म्हणून, देय असतील असे प्रवास भत्ते आणि दैनिक भत्ते किंवा इतर भत्ते मिळतील.

निधी निहित करणे आणि त्याचा वापर.

**१०.** या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, आणि त्याच्या प्रयोजनासाठी, निधी विश्वस्त समितीकडे निहित असेल आणि तिने तो धारण केला पाहिजे व त्याचा वापर केला पाहिजे.

विश्वस्त समितीची कामे.

**११.** (१) विश्वस्त समितीने निधीची व्यवस्था ठेवली पाहिजे.

(२) निधीची व्यवस्था ठेवताना, विश्वस्त समितीने या अधिनियमाच्या व त्याखाली तयार करण्यात आलेल्या विनियमांच्या तरतुदीस अधीन राहून,--

(अ) विश्वस्त निधीच्या मालकीच्या रकमा व मत्ता धारण केली पाहिजे ;

(ब) निधीत (सदस्य म्हणून) दाखल करून घेण्यासाठी किंवा पुन्हा दाखल करून घेण्यासाठी केलेले अर्ज स्वीकारले पाहिजेत, आणि असे अर्ज, ते मिळाल्याच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आत, निकालात काढले पाहिजेत ;

(क) निधीतून रक्कम मिळण्यासाठी, यथास्थिति, निधींच्या सदस्यांकडून, त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींकडून किंवा कायदेशीर प्रतीनिधींकडून, करण्यात येणारे अर्ज स्वीकारले पाहिजेत, असे अर्ज निकालात काढण्याकरता तिला आवश्यक वाटेल अशी चौकशी केली पाहिजे आणि असे अर्ज ते मिळाल्याच्या तारखेपासून, पाच महिन्यांच्या आत निकालात काढले पाहिजेत ;

(ड) विश्वस्त समितीच्या कार्यवृत्त पुस्तकात अर्जावर तिने घेतलेले निर्णय नमूद केले पाहिजेत ;

(ई) अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांनी अर्जदारांना रकमा दिल्या पाहिजेत ;

(फ) या अधिनियमाखालील तिची कर्तव्ये आणि कामे पार पाडण्यासाठी तिला आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सेवायोजनास मंजूरी दिली पाहिजे आणि त्यांच्या सेवेच्या शर्ती निश्चित केल्या पाहिजेत ;

(ग) विहित करण्यात येतील असे नियतकालिक व वार्षिक अहवाल, राज्य शासनाकडे आणि वकील परिषदेकडे पाठविले पाहिजेत ;

(ह) निधीत (सदस्य म्हणून) दाखल करून घेण्यासाठी किंवा पुन्हा दाखल करून घेण्यासाठी केलेल्या अर्जाच्या किंवा निधीचा लाभ मिळण्यासंबंधात केलेल्या मागण्यांच्या संबंधातील, विश्वस्त समितीचे निर्णय, अर्जदारांना पोचदेय नोंदणीकृत डाकेने कळविले पाहिजेत ;

(आय) या अधिनिमान्वये अणि त्याखाली केलेल्या विनियमान्वये तिने करणे आवश्यक असतील किंवा तिला करता येतील अशा इतर कृती केल्या पाहिजेत ;

निधी, कर्जे घेणे, गुंतवणूक करणे.

१२. (१) विश्वस्त समितीस, वकील परिषदेच्या शिफारशीने आणि राज्य शासनाच्या पूर्व संमतीने, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम कोणत्याही वेळी कर्जाऊ घेता येईल.

(२) विश्वस्त समितीने निधीचा सर्व पैसा आणि जमा रकमा कोणत्याही अनुसूचित बँकेत ठेवल्या पाहिजेत किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाने काढलेल्या युनिट्समध्ये, राष्ट्रीय डाककार्यालय बचत प्रमाणपत्रांमध्ये किंवा कोणत्याही इतर शासकीय कर्जरोख्यांमध्ये किंवा सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मालकीच्या किंवा त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या कोणत्याही महामंडळाला दिलेल्या कर्जामध्ये किंवा केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने उभारलेल्या कर्जामध्ये किंवा वकील परिषद राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने, वेळोवेळी निदेश देईल अशा कोणत्याही अन्य रीतीने गुंतविला पाहिजे.

(३) या अधिनियमान्वये देय व प्रदेय अशा सर्व रकमा आणि निधीच्या व्यवस्थापनाशी व तो चालविण्याशी संबंधित असा सर्व खर्च निधीतून देण्यात येईल.

(४) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० यातील 'स्थानिक निधी' व 'स्थानिक प्राधिकरण' या शब्दप्रयोगांच्या अर्थानुसार जणु काही हा निधी स्थानिक निधी आहे आणि विश्वस्त समिती ही स्थानिक प्राधिकरण आहे असे समजून, विश्वस्त समितीच्या लेख्यांची, मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांच्याकडून किंवा राज्य शासनाने उक्त अधिनियमान्वये लेखापरीक्षकाची कामे पार पाडण्याचे अधिकार दिलेल्या कोणत्याही अन्य व्यक्तीकडून, लेखापरीक्षा करून घेण्यात येईल. (१९३० चा मुंबई २५.)

(५) विश्वस्त समितीने लेखापरीक्षकाने प्रमाणित केलेले विश्वस्त समितीचे लेखे, त्यावरील लेखा परीक्षा अहवालासह, वकील परिषदेकडे पाठविले पाहिजेत आणि वकील परिषदेस, त्या संबंधाने तिला योग्य वाटतील असे निदेश विश्वस्त समितीला देता येतील.

(६) विश्वस्त समितीने लेखापरीक्षकाच्या अहवालाचे आणि पोट-कलम (५) अन्वये वकील परिषदेने दिलेल्या निदेशांचे अनुपालन केले पाहिजे.

सचिवाचे अधिकार आणि कर्तव्य.

**१३.** विश्वस्त समितीचा सचिव हा,–

(अ) विश्वस्त समितीचा मुख्य कार्यकारी प्राधिकारी असेल आणि तिच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास जबाबदार असेल ;

(ब) समितीच्या तर्फे व तिच्याविरुध्द असलेल्या सर्व वादांत आणि कार्यवाहीत विश्वस्त समितीचे प्रतिनिधित्व करील ;

(क) विश्वस्त समितीचे सर्व निर्णय आणि अनुदेश आपल्या सहीने अधिप्रमाणित करील ;

(ड) कोषपालासह संयुक्तपणे विश्वस्त समितीच्या बँकेतील खात्याचा व्यवहार करील ;

(इ) विश्वस्त समितीच्या बैठकी बोलावील आणि त्यांची कार्यवृत्ते तयार करील ;

(फ) आवश्यक अशा सर्व अभिलेखांसह व माहितीसह, विश्वस्त समितीच्या बैठकींना उपस्थित राहील ;

(ग) वेळोवेळी विहित करण्यात येतील असे नमुने, नोंदवह्या आणि इतर अभिलेख ठेवील आणि विश्वस्त समितीसंबंधीचा सर्व पत्रव्यवहार करील ;

(ह) मुद्रांकाच्या संबंधात, वकील संघाचे लेखे आणि नोंदवह्या यांची नियतकालिक तपासणी व पडताळणी करील ;

(आय) विश्वस्त समितीने प्रत्येक वित्तीय वर्षात केलेल्या कामांचे वार्षिक विवरण तयार करील ; आणि

(जे) समितीने मंजूर केल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची विश्वस्त समितीवर नेमणूक करील आणि अशा कोणत्याही अधिकाऱ्याविरुध्द किंवा कर्मचाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्याचे अधिकार त्यास असतील ;

(के) राज्य शासन, विश्वस्त समिती आणि वकील परिषद निदेश देतील अशा अन्य कृती करील.

## प्रकरण चार

## वकील संघाला मान्यता व त्याची नोंदणी

१४. (१) कोणत्याही विवादात पुरावा घेण्यास किंवा त्याचा अभिनिर्णय करण्यास किंवा निर्णय करण्यास कायद्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही न्यायालयात किंवा न्यायाधिकरणासमोर किंवा अन्य प्राधिकरणासमोर किंवा व्यक्तीसमोर कामकाज चालवणाऱ्या आणि कोणत्याही नावाने ओळखल्या जाणाऱ्या सर्व अधिवक्ता संघांना, अधिसूचित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी अथवा वकील परिषद यासंबंधात अधिसूचित करील अशा वाढीव तारखेपूर्वी, वकील परिषदेकडे, विहित नमुन्यात मान्यतेसाठी व नोंदणीसाठी अर्ज करता येईल. वकील संघाला मान्यता व त्याची नोंदणी.

या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेनंतर रचना करण्यात आलेल्या कोणत्याही अधिवक्ता संघास त्यानंतर कधीही वकील परिषदेकडे मान्यतेसाठी व नोंदणीसाठी त्याच रीतीने अर्ज करता येईल.

(२) मान्यतेसाठी व नोंदणीसाठी केलेल्या प्रत्येक अर्जासोबत, संघाचे नियम व उपनियम, संघाच्या पदाधिकाऱ्यांची नावे व पत्ते आणि संघाच्या सदस्यांची नावे व प्रत्येक सदस्याचे वय, पत्ता नोंदणीची तारीख व व्यवसायाचे सर्वसाधारण ठिकाण दर्शविणारी अद्यावत सूची जोडली पाहिजे.

(३) वकील परिषदेस, आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर संघाला मान्यता देता येईल व विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, नोंदणी प्रमाणपत्र देता येईल.

(४) वकील संघाची मान्यता व नोंदणी याबाबतचा वकील परिषदेचा निर्णय अंतिम असेल.

१५. (१) प्रत्येक वकील संघाने दर वर्षी १५ एप्रिल रोजी वा त्यापूर्वी, वकील परिषदेला, वर्षाच्या ३१ मार्च रोजी असल्याप्रमाणे आपल्या सदस्यांची यादी कळविली पाहिजे. वकील संघाची कर्तव्ये.

(२) प्रत्येक वकील संघाने वकील परिषदेला—

(अ) संघाच्या पदाधिकाऱ्यांमध्ये काही बदल झाल्यास तो, असा बदल झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत कळविला पाहिजे ;

(ब) नव्याने दाखल करून घेतलेले सदस्य व पुनः दाखल करून घेतलेले सदस्य धरून सदस्यत्वामध्ये झालेला कोणताही बदल, असा बदल झाल्यापासून तीस दिवसांच्या आत कळविला पाहिजे ;

(क) आपल्या कोणत्याही सदस्याचा मृत्यू होणे, तो सेवानिवृत्त होणे किंवा त्याने स्वेच्छेने व्यवसाय स्थगित ठेवणे यापैकी कोणतीही गोष्ट घडल्यापासून ती तीस दिवसांच्या आत कळविली पाहिजे ; आणि

(ड) वकील परिषद वेळोवेळी विहित करील अथवा तिला आवश्यक वाटेल अशी अन्य माहिती कळविली पाहिजे.

## प्रकरण पाच

## निधीचे सदस्यत्व आणि त्यातून रकमेचे प्रदान

१६. (१) राज्यात कोणत्याही विवादांत पुरावा घेण्यास, त्याचा अभिनिर्णय करण्यास किंवा निर्णय करण्यास कायद्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही न्यायालयासमोर किंवा कोणत्याही न्यायाधिकरणासमोर किंवा कोणत्याही प्राधिकरणासमोर, वा व्यक्तीसमोर, वकीलीचा व्यवसाय करणाऱ्या आणि वकील परिषदेने, कलम १४ अन्वये मान्यता दिलेल्या वकील संघाचा सदस्य असलेल्या प्रत्येक अधिवक्त्यास, विश्वस्त समितीकडे निधीचा सदस्य म्हणून दाखल होण्याकरिता, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, अर्ज करता येईल. निधीचे सदस्यत्व.

(२) पोट-कलम (१) अनुसार अर्ज मिळाल्यावर, विश्वस्त समितीने तिला योग्य वाटेल, अशी चौकशी केली पाहिजे आणि एकतर अर्जदाराला निधीचा सदस्य म्हणून दाखल करून घेतले पाहिजे किंवा लेखी कारणे नमूद करून तो अर्ज नाकारला पाहिजे :

परंतु, अर्जदाराला आपले म्हणणे मांडण्याची संधी दिल्याखेरीज, अर्ज नाकारणारा कोणताही आदेश काढता कामा नये.

(३) अर्जासाठी असलेली फी—

(एक) ज्या अर्जदाराने अर्जाच्या तारखेस बारा वर्षे किंवा त्याहून अधिक मुदतीसाठी व्यवसाय केला असेल त्या अर्जदाराच्या बाबतीत दोनशे रुपये असेल ; आणि

(दोन) ज्या अर्जदाराने अर्जाच्या तारखेस बारा वर्षापेक्षा कमी मुदतीसाठी व्यवसाय केला असेल त्या अर्जदाराच्या बाबतीत शंभर रुपये असेल ;

आणि अशी अर्जाची फी एका वर्षात चार समान हप्त्यात आणि विहित करण्यात येईल अशा रीतीने देय असेल व पहिला हप्ता अर्जासोबत द्यावा लागेल :

परंतु, अनुसूचित जातीतील किंवा अनुसूचित जमातीतील उमेदवाराला यथास्थिती, खंड (एक) किंवा खंड (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या फीच्या रकमेच्या निम्म्याइतकी, अर्जासाठी असलेली फी द्यावी लागेल.

(४) एखादा अर्ज नाकारण्यात आल्यास, अर्जासोबत भरलेला फीचा पाहिला हप्ता, अर्जदाराला परत केला पाहिजे.

(५) प्रत्येक सदस्याने, दर वर्षी ३१ डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी निधीची वार्षिक वर्गणी पुढील दरांनी भरली पाहिजे :—

| | |
|---|---|
| जेव्हा, मागील ३१ डिसेंबरला अधिवक्त्याच्या वकिली व्यवसायाची पाच वा अधिक वर्षे पूर्ण झालेली असतील परंतु ती पंधरा वर्षाहून कमी असतील तेव्हा. | पन्नास रुपये. |
| जेव्हा, मागील ३१ डिसेंबर रोजी अधिवक्त्याच्या वकिली व्यवसायांची पंधरा वा अधिक वर्षे पूर्ण झालेली असतील तेव्हा. | शंभर रुपये. |

(६) सदस्याला, पोट-कलम (५) खालील आपली वार्षिक वर्गणी, त्याच्या इच्छेनुसार दोन सहामाही समान हप्त्यांत भरण्याचा हक्क असेल ; पहिला हप्ता प्रत्येक वर्षी ३० जून रोजी किंवा तत्पूर्वी देय होईल तर दुसरा हप्ता ३१ डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी देय होईल.

(७) यथास्थिती, आपली वार्षिक वर्गणी किंवा सहामाही हप्ता, पोट-कलम (५) किंवा पोट-कलम (६) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या तारखांना किंवा त्यापूर्वी, भरण्यात कसूर करील असा कोणताही सदस्य, विश्वस्त समितीकडून एक महिन्याची लेखी नोटीस दिल्यानंतर निधीच्या सदस्यत्वातून काढून टाकण्यास पात्र ठरेल.

(८) पोट-कलम (७) अन्वये ज्या व्यक्तीला निधीच्या सदस्यत्वातून काढून टाकले असेल त्या व्यक्तीने, काढून टाकल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आंत दरसाल दरशेकडा बारा दराने व्याजासहित थकबाकीची रक्कम भरल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात येईल.

(९) प्रत्येक सदस्याने, निधीचा सदस्य म्हणून दाखल होताना एका किंवा अधिक व्यक्तींचे नामनिर्देशन केले पाहिजे आणि त्याला निधीतून देय होणारी रक्कम प्रत्यक्ष मिळण्यापूर्वी त्याचा मृत्यू ओढवल्यास त्या नामनिर्देशित व्यक्तींना ती रक्कम घेण्याचे अधिकार दिले पाहिजेत.

(१०) जर, सदस्याने, पोट-कलम (९) अन्वये एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित केले असेल तर त्याने, त्यापैकी प्रत्येक व्यक्तीला एकूण रकमेपैकी किती रक्कम किंवा हिस्सा मिळावा हे नामनिर्देशन पत्रात विनिर्दिष्ट केले पाहिजे. ही वाटणी त्याने त्याला देय असलेली संपूर्ण रक्कम विभागली जाईल अशारीतीने केली पाहिजे.

(११) सदस्याला, कोणत्याही वेळी, विश्वस्त समितीकडे लेखी नोटीस पाठवून नामनिर्देशन रद्द करता येईल, मात्र अशा नोटिशीसोबत सदस्याने नवीन नामनिर्देशन पाठविले पाहिजे.

(१२) स्वेच्छेने व्यवसाय स्थगित ठेवणाऱ्या किंवा सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येक सदस्याने, अशा स्थगितीपासून वा सेवानिवृत्तीपासून पंधरा दिवसांच्या आत, विश्वस्त समितीला त्याबाबत कळविले पाहिजे आणि एखादा सदस्याने जर पुरेशा कारणांशिवाय तसे करण्यात कसूर केली तर, विश्वस्त समिती, विहित करण्यात येतील अशा तत्वांनुसार, त्या सदस्याला देय असणाऱ्या रकमेत घट करील.

व्यवसाय बंद झाल्यावर निधीतून रक्कम देणे.

१७. (१) निधीच्या सदस्याचा व्यवसाय बंद झाल्यावर त्याला निधीतून अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या दराने, रक्कम मिळण्याचा हकक असेल;

परंतु, पोट-कलम (४) खाली, वर्षाच्या उर्वरित भागाच्या संबंधात, न्यायासनासमोर वकिलीचा व्यवसाय केलेले प्रत्येक वर्ष हे, त्या व्यवसायाचे तीन महिने म्हणून गणले जातील त्याबाबतीत, त्या सदस्याला याप्रमाणे गणना केलेल्या अशा प्रत्येक कालखंडाबद्दल दोनशे पन्नास रुपये इतकी जादा रक्कम मिळण्याचा हकक असेल,

(२) सदस्याचा मृत्यू झाल्यास, ती रक्कम त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीला दिली पाहिजे अथवा नामनिर्देशित व्यक्ती नसेल त्याबाबतीत, त्या सदस्याच्या कायदेशीर वारसाने वारसाहक्क प्रमाणपत्र सादर केल्यावर, त्यास ती रक्कम दिली पाहिजे.

(३) निधीचा सदस्य म्हणून दाखल झाल्यापासून पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्या सदस्याला सेवानिवृत्ति लाभ कोणत्याही वेळी घेण्याची मुभा राहील. परंतु, तो सदस्य, विहित करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, नवीन सदस्य म्हणून पुन्हा निधीचा सदस्य होण्यास पात्र असेल;

परंतु, कायम स्वरुपाचे अपंगत्व आलेल्या सदस्याला,तो निधीचा सदस्य म्हणून दाखल झाल्यापासून पाच वर्षांच्या आत, सेवानिवृत्त होण्यास परवानगी दिली पाहिजे.

(४) अनुसूचीत नमूद केलेल्या न्यायासनासमोरील व्यवसाय वर्षाची, या अधिनियमाखालील प्रदानासाठी गणना करताना, निधीसाठी सदस्याला दाखल करुन घेण्यापूर्वी सदस्याने न्यायासनासमोर व्यवसाय केलेला असेल तर, वकील म्हणून केलेल्या व्यवसायाच्या प्रत्येक चार वर्षांबद्दल, एक वर्ष व्यवसाय केल्याचे समजण्यात येईल; आणि उरलेल्या वर्षाबाबत, प्रत्येक पूर्ण वर्षाबद्दल, तीन महिने व्यवसाय केल्याचे समजण्यात येईल; आणि असा हिशोब करुन काढलेल्या पूर्ण वर्षांची बेरीज, निधीत दाखल करुन घेतल्यानंतरच्या व्यवसाय वर्षामध्ये मिळविली जाईल.

(५) निधीत दाखल करुन घेतल्यानंतर, पाच वर्षांच्या आत एखादा सदस्य मरण पावला तर त्याची नामनिर्देशित व्यक्ती किंवा यथास्थिति, कायदेशीर वारस हा, व्यवसायाच्या प्रत्येक वर्षाबद्दल एक हजार रुपये दराने रक्कम मिळण्यास पात्र होईल.

(६) निधीतून रक्कम मिळविण्यासाठी करावयाचा अर्ज हा विहित करण्यात येईल अशा नमुन्यात विश्वस्त समितीकडे सादर केला पाहिजे.

(७) एखाद्या सदस्याने, निधीत दाखल झाल्यानंतर, पाच वर्षांच्या आत, स्वेच्छेने व्यवसाय बंद करील (त्याच्या मृत्यूखेरीज अन्य कारणाने) त्याबाबतीत, त्याला विहित करण्यात येईल अशा नमुन्यात त्यासाठी अर्ज केल्यानंतर, कलम १६, पोट-कलम (५) खाली त्याने भरलेली वार्षिक वर्गणी परत मिळविण्याचा हक्क असेल.

(८) पोट-कलम (६) किंवा (७) खाली मिळालेला अर्ज, विश्वस्त समितीने, तिला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, निकालात काढला पाहिजे.

## प्रकरण सहा

## वकील परिषदेने मुद्रांक छापवून घेणे व त्यांचे वितरण करणे

मुद्रांकाची छपाई व त्यांचे वितरण आणि वकील परिषदेने विक्रीचे उत्पन्न विश्वस्त समितीकडे देणे.

**१८.** (१) वकील परिषदेने, प्रत्येकी, दोन रुपये किंमत असणारे, वकील परिषदेचे ध्येयचिन्ह आणि किंमत दर्शवणारे, कल्याण निधि मुद्रांक छापवून त्यांचे वितरण करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) मुद्रांकाचा आकार, १" X २" एवढा असेल व ते फक्त निधीच्या सदस्यांनाच विकले जातील.

(३) मुद्रांकाचा सुरक्षित अभिरक्षेस वकील परिषद जबाबदार राहील.

(४) वकील परिषदेने (वकील संघामार्फत, मुद्रांकांच्या वितरणावर आणि विक्रीवर नियंत्रण ठेवले पाहिजे).

(५) वकील परिषदेने आणि वकील संघाने विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशारीतीने मुद्रांकाचे योग्य हिशोब ठेवले पाहिजेत.

(६) वकील संघांनी, मुद्रांकाच्या किंमतीच्या दहा टक्के इतकी किंमत आनुषंगिक खर्चासाठी वजा करुन, बाकीची किंमत वकील परिषदेला देवून, मुद्रांक खरेदी केले पाहिजेत.

(७) वकील परिषदेने मुद्रांकांच्या विक्रीच्या उत्पन्नामधून, मुद्रांकांच्या मुद्रणाचा आणि वितरणाचा प्रत्यक्ष खर्च वजा केल्यानंतर, मुद्रांक विकून आलेली सर्व रक्कम, प्रत्येक तिमाहीच्या समाप्तीपासून १५ दिवसांच्या आत, विश्वस्त समितीकडे दिली पाहिजे.

## प्रकरण सात

## संकीर्ण

वकीलपत्रावर मुद्रांक असणे.

**१९.** (१) निधीच्या प्रत्येक सदस्याने, त्याने भरलेल्या प्रत्येक वकीलपत्रावर, कलम १८ च्या पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेला एक कल्याणनिधी मुद्रांक लावला पाहिजे आणि अशाप्रकारे मुद्रांक न लावलेले कोणतेही वकीलपत्र कलम १४ मध्ये निर्दिष्ट केलेल्या न्यायालयासमोर, न्यायधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर किंवा व्यक्तींसमोर दाखल करता कामा नये किंवा त्यांनी ते स्वीकारता कामा नये.

(२) मुद्रांकाची किंमत खटल्याच्या खर्चात धरता कामा नये किंवा कोणत्याही प्रसंगी ती अशीलाकडून वसूलही केली जाता कामा नये.

(३) कोणत्याही सदस्याने, पोट-कलम (२) च्या तरतुदींचा कोणत्याही प्रकारे भंग केल्यास, तो, या निधीचा फायदा मिळण्याचा त्याचा हक्क गमावून बसेल आणि विश्वस्त समितीने अशी घटना उचित कारवाईसाठी वकील परिषदेला कळविली पाहिजे.

वकीलपत्रावर लावलेला कल्याण निधी मुद्रांक रद्द करणे.

**२०.** कोणत्याही न्यायालयासमोर, न्यायाधिकरणासमोर किंवा इतर प्राधिकरणासमोर किंवा व्यक्तींसमोर दाखल केलेल्या वकीलपत्रावर कलम १९, पोट-कलम (१) अन्वये लावलेला प्रत्येक मुद्रांक मुंबई न्यायालय. फी अधिनियम, १९५९ च्या कलम ४२ मध्ये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने रद्द करण्यात येईल. १९५९ चा मुंबई ३६.

**२१. कलमे १९ आणि २० मधील कोणतीही गोष्ट पुढील बाबतीत लागू असणार नाही : -** विवक्षित प्रकरणात कलमे १९ व २० पासून सूट.

(अ) कलम १४ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने किंवा अन्य प्राधिकरणाने किंवा व्यक्तीने, त्यांच्यासमोरील खटल्यातील किंवा इतर कार्यवाहीतील कोणत्याही बाबींमध्ये, दरिद्री व्यक्तीला मदत करण्यासाठी नेमलेले अधिवक्ते;

(ब) ज्या पक्षकारांना वकील परिषदेकडून किंवा तिच्या कायदेविषयक सहाय्य समितीकडून किंवा केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून कायदेविषयक सहाय्य देण्यात येते अशा पक्षकारांना कायदेविषयक सहाय्य देण्याच्या बाबतीत हजर राहणारे अधिवक्ते;

(क) न्यायालयाला न्यायमित्र म्हणून मदत करण्यासाठी न्यायालयाने आरोपीसाठी नेमलेले अधिवक्ते किंवा अन्य प्रकारे न्यायमित्र म्हणून हजर राहणारे अधिवक्ते;

(ड) वकील परिषदेच्या किंवा कोणत्याही वकील संघाच्या वतीने हजर राहणारे अधिवक्ते.

२२. (१) विश्वस्त समितीच्या कोणत्याही निर्णयाविरुध्दचे अपील वकील परिषदेकडे केले पाहिजे ; समितीच्या कोणत्याही निर्णयाविरुध्द अपील.

(२) ते अपील विहीत नमुन्यात असले पाहिजे; आणि त्यासोबत पुढील गोष्टी असल्या पाहिजेत : –

(अ) ज्याविरुध्द अपील केले तो आदेश; आणि

(ब) परत केली जाणार नसलेली शंभर रुपये इतकी फी.

(३) ज्या आदेशाविरुध्द अपील करणत आले असेल तो आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत अपील केले पाहिजे.

(४) अपीलावरील वकील परिषदेचा निर्णय अंतिम असेल.

२३. (१) निधीच्या सदस्यांच्या कल्याणासाठी विश्वस्त समितीला,– सदस्यांसाठी गट आयुर्विमा आणि अधिवक्त्यांसाठी इतर लाभ.

(अ) निधीच्या सदस्यांसाठी भारताच्या आयुर्विमा महामंडळाकडून गट विमापत्रे घेता येईल;

(ब) निधीचे सदस्य आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांच्यासाठी वैद्यकीय आणि शैक्षणिक सोयीची तरनूद करता येईल; आणि

(क) निधीच्या सदस्यांच्या वापरासाठी, मायताप्राप्त आणि नोंदणीकृत वकील संघांसाठी चांगल्या ग्रंथालयाच्या सोयींची तरतुद करता येईल; आणि

(ड) विहित करण्यात येतील असे इतर लाभ आणि सुखसोयी यांची तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, विश्वस्त समितीला, निधीचे सदस्य असणाऱ्या किंवा असणार नाहीत अशा दरिद्री, अपंग किंवा इतर अधिवक्त्यांसाठी कल्याणकारी योजना संघटित करण्यासाठी निधीमधून स्वेच्छानिर्णयानुसार वित्तीय सहाय्यदेखील देता येईल.

२४. (१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, निधींच्या कोणत्याही सदस्याचा हितसंबंध किंवा एखादा सदस्य किंवा त्याने नाम-निर्देशित केलेली व्यक्ती किंवा तिचा कायदेशीर वारस यांचा निधीमधून कोणतीही रक्कम मिळण्याचा कोणताही हक्क अभिहस्तांकित, अन्यसंक्रामित किंवा भारित होता कामा नये किंवा तो कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा इतर प्राधिकरणाच्या किंवा व्यक्तीच्या कोणत्याही हुकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये जप्त केला जाण्यास पात्र असता कामा नये. निधीच्या सदस्यांच्या हितसंबंधाचे अन्यसंक्रामण, जप्ती इत्यादींवर निर्बंध.

(२) कोणत्याही धनकोला, निधीविरुध्द किंवा कोणत्याही सदस्याच्या किंवा त्याने नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीच्या किंवा कायदेशीर वारसाच्या निधीमधील हितसंबंधांविरुध्द कारवाई करण्याचा हक्क असता कामा नये.

**स्पष्टीकरण.-** या कलमाच्या प्रयोजनासाठी, "धनको" या संज्ञेत, राज्य किंवा इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९ प्रादेशिक नादारी अधिनियम, १९२० किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये नेमण्यात आलेला शासकीय अभिहस्तांकिती किंवा धारक यांचा अंतर्भाव होईल. १९०९ चा ३, १९२० चा ५.

सद्भावनेने केलेल्या कृतीचे संरक्षण.

**२५.** (१) कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमानुसार सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीविरुध्द कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कारवाई करता येणार नाही..

(२) या अधिनियमानुसार किंवा त्याखाली करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमानुसार, सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे हानी झाली असेल किंवा हानी होण्याचा संभव असेल तर त्यासाठी, विश्वस्त समितीविरुध्द किंवा वकील परिषदेविरुध्द कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कारवाई करता येणार नाही.

दिवाणी न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध.

**२६.** (१) या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विश्वस्त समितीने किंवा वकील परिषदेने ज्या प्रश्नांची मिटवणूक करणे, त्यावर निर्णय करणे किंवा त्यावर कार्यवाही करणे आवश्यक आहे अशा कोणत्याही प्रश्नाची कोणत्याही दिवाणी न्यायालयाला मिटवणूक करण्याची, त्यावर निर्णय किंवा कार्यवाही करण्याची अधिकारिता असणार नाही. १९०९ चा ५.

साक्षीदारांना बोलाविण्याचे आणि पुरावा घेण्याचे अधिकार.

**२७.** दिवाणी प्रक्रीया संहिता, १९०८ खाली खटला चालविताना दिवाणी न्यायालयाकडे जे अधिकार निहित असतात तेच अधिकार पुढील बाबींच्या संबंधात या अधिनियमाखालील कोणतीही चोकशी करण्यासाठी विश्वस्त समिती किंवा वकील परिषद यांना असतील :–

(अ) कोणत्याही व्यक्तीस उपस्थित राहण्यास भाग पाडणे किंवा तिची शपथेवर तपासणी करणे;

(ब) कागदपत्रे शोधण्यास व ते सादर करण्यास फर्माविणे;

(क) शपथपत्रावर पुरावा घेणे;

(ड) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे;

विनियम करण्याचे अधिकार.

**२८.** वकील परिषदेला, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनासाठी आणि या अधिनियमान्वये विहित करावयाच्या किंवा विहित करता येतील अशा बाबींसाठी, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनियम करता येतील.

# अनुसूची

(कलमे ११ आणि १७ पहा)

| | | रुपये | | | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ३० वर्षे वकिली | .. | ३०,००० | १७ वर्षे वकिली | .. | १७,००० |
| २९ वर्षे वकिली | .. | २९,००० | १६ वर्षे वकिली | .. | १६,००० |
| २८ वर्षे वकिली | .. | २८,००० | १५ वर्षे वकिली | .. | १५,००० |
| २७ वर्षे वकिली | .. | २७,००० | १४ वर्षे वकिली | .. | १४,००० |
| २६ वर्षे वकिली | .. | २६,००० | १३ वर्षे वकिली | .. | १३,००० |
| २५ वर्षे वकिली | .. | २५,००० | १२ वर्षे वकिली | .. | १२,००० |
| २४ वर्षे वकिली | .. | २४,००० | ११ वर्षे वकिली | .. | ११,००० |
| २३ वर्षे वकिली | .. | २३,००० | १० वर्षे वकिली | .. | १०,००० |
| २२ वर्षे वकिली | .. | २२,००० | ९ वर्षे वकिली | .. | ९,००० |
| २१ वर्षे वकिली | .. | २१,००० | ८ वर्षे वकिली | .. | ८,००० |
| २० वर्षे वकिली | .. | २०,००० | ७ वर्षे वकिली | .. | ७,००० |
| १९ वर्षे वकिली | .. | १९,००० | ६ वर्षे वकिली | .. | ६,००० |
| १८ वर्षे वकिली | .. | १८,००० | ५ वर्षे वकिली | .. | ५,००० |

शा. मु. औ.– (एच) २७०–२०००–पुस्तके–११–२००१.

शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद